

कर्नाळा किल्ला... पान 2

दैनिक **अक्षराज** अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

दुसऱ्यासाठी डोळ्यात पाणी आलं कि समजावं, आपल्यात अजुन माणुसकी शिल्लक आहे.

वर्ष : ०५ | अंक : १०७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.३० नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विभागाकडून मोठी कारवाई ! बंदी असलेले २.४ टन मासे सापडले

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२९, पुणे :**



राज्यासह देशभरात अनेकांना मासे खायला आवडतात. अनेकांना वेगवेगळ्या प्रजातींचे मासे खायला आवडतात. अनेकांना विविध प्रजातींच्या माशांची चव कशी असते ते ठावूक असते. खवय्यांची मागणी पाहता मत्स्यव्यवसायाला चालना देखील मिळते. मत्स्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात यशस्वी होतो. मत्स्य व्यवसायाला चालना मिळावी यासाठी सरकारकडून देखील महत्त्वाची पावलं उचलली जातात. तसेच राज्याच्या मत्सव्यवसाय विभागाकडून देखील विविध उपक्रम राबवले जातात. याशिवाय ज्या ठिकाणी चुकीच्या गोष्टी घडतात, बेकायदेशीर गोष्टी घडतात त्या विरोधात देखील महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विभागाकडून कारवाई केली जाते. आतादेखील अशीच मोठी कारवाई समोर आली आहे.

उजनी जलाशयात बेकायदेशीरपणे मत्स्यव्यवसाय केला जात असल्याचा प्रकार राज्याच्या मत्सव्यवसाय विभागाच्या निदर्शनास आला आहे. या ठिकाणी बंदी असलेल्या आफ्रिकन कॅटफिशची शेती केली जात असल्याचं विभागाच्या लक्षात आलं आहे. तब्बल २.४ आफ्रिकन कॅटफिश इथे आढळली आहे. या आफ्रिकन कॅटफिशवर देशात बंदी आहे. ही बंदी आतापासून नाही तर १९९७ पासून आहे. कारण या आफ्रिकन कॅटफिशमुळे स्थानिक माशांच्या प्रजातींवर मोठं संकट येतं. त्यामुळे या माशांच्या प्रजातीवर बंदी आहे. असं असताना अशाप्रकारच्या माशांच्या प्रजातीची शेती काही मत्स्य व्यवसायिकांकडून केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. इंदापूरमधील कलठाण क्रमांक २ येथे अशा प्रकारची मत्सत्य व्यवसाय शेती केली जात होती. विशेष म्हणजे अनेकवेळा याबाबत इशारा देवूनही आदेशाला न जुमानता अशाप्रकारे शेती केली जात होती. त्यामुळे या भागात राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाने कारवाई केली आहे. संबंधित बेकायदेशीर साठा हा बाजारात नेला जात होता. पण त्यांना अधिकाऱ्यांनी पकडलं. राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहाय्यक आयुक्त अर्चना शिंदे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी राठोड आणि अधिकारी तुषार वाळुंज, दीपाली गुंड आणि गजानन काटे यांनी या कारवाईत मौल्यवान भूमिका निभावली. या कारवाईला कारणही तसंच आहे. आफ्रिकन कॅटफिश ही प्रजाची स्थानिक माशांच्या प्रजातींसाठी धोकादायक आहे. तसेच पाणथळमधील जैवविधतेवरही त्याचा मोठा परिणाम पडू शकतो.

याशिवाय आफ्रिकन कॅटफिश हे कमी ऑक्सिजन असलेल्या पाण्यातही जगू शकतात. तसेच ही वेगाने वाढणारी प्रजाती आहे. या माशांमुळे स्थानिक मासेमार व्यवसायिकांच्या उपजिवेकरही वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या माशांच्या प्रजातीची शेती करण्यास वारंवार बंद करण्याचं आवाहन केलं जात होतं. अखेर या प्रकरणी विभागाला कठोर कारवाई करावी लागली आहे.

## केएल राहुलच्या नेतृत्वात आजपासून एकदिवसीय मालिका

**अक्षराज : वृत्तसंकलन**




**दि.२९, रांची :** केएल राहुलला भारताचे कर्णधारपद मिळाले खरे, पण वनडे संघात रोहित शर्मा आणि विराट कोहलीदेखील खेळतात. त्यामुळे रोहित आणि विराट संघात असताना कर्णधार केएल राहुल हा कितव्या स्थानावर पहिल्या वनडे सामन्यात फलंदाजीला येणार आहे, हे आता स्पष्ट झाले आहे.

रोहित शर्मा हा संघात असल्यामुळे तो सलामीला येणार, हे निश्चित आहे. पण रोहित शर्माबरोबर यावेळी सलामीला कोण येणार, हे अद्याप निश्चित झालेले नाही. कारण या मालिकेत शुभमन गिल नाही. त्यामुळे यशस्वी जयस्वाल आणि ऋतुराज गायकवाड यांच्यापैकी एक खेळाडू सलामीला येऊ शकतो किंवा केएल राहुलही सलामीला येऊ शकतो, पण राहुल सलामीला येणार नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. पण दुसऱ्या सलामीवीराचा निर्णय अद्याप होऊ शकलेला नाही. तिसऱ्या स्थानावर तर विराट कोहली फलंदाजीला येणार हे निश्चित आहे. त्यामुळे पहिल्या तीन जागा तर निश्चित आहेत. त्यामुळे आता केएल राहुल कोणत्या स्थानावर फलंदाजीला येणार, हे आता समोर आले आहे. पहिल्या वनडे सामन्यापूर्वी एक पत्रकार परिषद झाली आणि त्यामध्ये केएल राहुलनेच याबाबतची माहिती दिली आहे.

केएल राहुल म्हणाला की, भारतीय संघात फलंदाजीचा चांगला समन्वय पाहायला मिळत आहे. त्याचबोरबर कोणता खेळाडू कोणत्या स्थानावर फलंदाजीला येणार, हेदेखील आम्ही आता निश्चित केले आहे. फलंदाजीचा क्रम असा असावा की, प्रत्येकाला चांगला वाव मिळायला हवा आणि चांगल्या धावाही व्हायला हव्यात. त्यामुळे एकंदरीत संघाची फलंदाजीची क्रमवारी पाहता, मी सहाव्या स्थानावर फलंदाजीला येणार असल्याचे ठरवले आहे. कारण सहाव्या स्थानावर फलंदाजीला आल्यावर चांगला समतोल साधला जाऊ शकतो, असे मला वाटते. त्यामुळे आम्ही हा निर्णय घेतला आहे. पहिल्या तीन स्थानांमध्ये रोहित आणि विराटसारखे दमदार फलंदाज आहेत, ज्यांच्याकडे चांगला अनुभवही आहे. पण तळाच्या फलंदाजी क्रमात अनुभवी फलंदाजी असायला हवा, त्यामुळे राहुलला सहाव्या स्थानावर फलंदाजीसाठी ठेवण्यात आले असावे, असे आता म्हटले जात आहे. शुभमन गिल ही मालिका खेळणार नसल्यामुळे केएल राहुलकडे यावेळी भारताचे कर्णधारपद असणार आहे.

## निरा लोणंद मार्गावर धावती कार पेटली वीर योद्धा प्रतिष्ठानच्या मदतीने वाचले तिघांचे प्राण

**अक्षराज : स्वप्नील जावळे**



**दि.२९, लोणंद (सातारा) :** लोणंद –लोणंद निरा रस्त्यावरील पाडेगाव पाटी येथे शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास घडलेली दुर्घटना मोठ्या अनर्थाला कारणीभूत ठरली असती नागपूरहून नरसोबाची वाडी या दिशेने प्रवास करणारी चक४० अउ ६५४६ ही कार पाडेगाव पाठीच्या ओढ्याजवळून जात असताना अचानक कारच्या बोनेट मधून दूर बाहेर येत असल्याचे कारचालक व प्रवाशांच्या लक्षात आले काही कळायच्या आतच आगीची तीव्रता वाढत गेली आणि कारणे अचानक पेट घेतला गाडीमध्ये असलेल्या तिघांचा जीव धोक्यात आला असताना नेमके त्याच वेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या वीर योद्धा प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब ढावरे आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी त्यांना मदत केली व त्या कारमधून कारचालक वासुदेव युवनाटे , अभिजीत दार्वेकर , मंगेश दार्वेकर यांना सुखरूप बाहेर काढले. या घटनेची माहिती मिळताच लोणंद पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले पुढील तपास सुरू केला असून वाहनात आग लागण्याचे नेमके कारण शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या घटनेत विर योद्धा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी दाखवलेले धाडस प्रसंगावधान व मानवता हे संपूर्ण परिसरासाठी प्रेरणादाराही आहे सामाजिक संकटाच्या वेळी लोकांचे प्राण वाचवणे हीच खरी मनुष्य धर्माची सेवा असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले संकट समई केलेले या धाडसी मदतीमुळे वीर योद्धा प्रतिष्ठान च्या सर्व कार्यकर्त्यांचे लोणंद आणि पंचक्रोशीतून सर्वत्र कौतुक होत आहे.

## डोंगराळ प्रकरणाचा निषेध : लासलगावमध्ये कडकडीत बंद; विद्यार्थ्यांचा पोलिस ठाण्यावर मोर्चा





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.२९, विंचूर (नाशिक) :** संपूर्ण राज्याला हादरवून सोडणाऱ्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळ येथील चिमुरडीवरील अत्याचार आणि निर्घृण खुनाच्या घटनेविरोधात राज्यभरातून संतापाची लाट उसळली आहे. या अमानुष कृत्य करणाऱ्या नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी तसेच हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालावा, या मागण्यांसाठी सर्वत्र निषेध मोर्चे काढले जात आहेत. या पार्श्वभूमीवर लासलगाव येथे ग्रामस्थ व समस्त सोनार समाजाच्या वतीने कडकडीत बंद पाळून निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे या मोर्चामध्ये शालेय विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. मोर्चादरम्यान लासलगाव पोलिसांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. घटनेविरोधातील समाजातील संताप आणि न्यायाच्या मागणीबाबत संपूर्ण आढावा घेतला असून, काही शाळकरी विद्यार्थिनींनी प्रतिक्रिया- देखील नोंदवल्या आहेत.

## नांदेडात खळबळ ! लेकीच्या प्रियकराला बापाने संपवलं !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२९, नांदेड :** नांदेड शहरात गुरुवारी संध्याकाळी प्रेमप्रकरणातून एका मुलीच्या कुटुंबीयांनी एका तरुणाचा खून केला होता. सक्षम ताटे या तरुणाला मुलीचे वडील आणि भावाने पाठलाग करुन ठार मारले होते. सक्षमवर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या.

यानंतर त्याच्या डोक्यात फरशी घालून त्याला निर्घृणपणे संपवण्यात आले होते. सक्षम ताटे याचे त्याच्या मित्राची बहीण आंचल मामीलवाड हिच्याशी प्रेमसंबंध होते. याची कुणकुण लागल्यानंतर आंचलच्या वडिलांनी सक्षमला आपल्या मुलीपासून दूर राहण्यास सांगितले होते. मात्र, त्यानंतरही या दोघांचे प्रेमप्रकरण सुरु राहिल्याने गुरुवारी संध्याकाळी नांदेड शहरातील जुना गंज भागात आंचलचे वडील आणि भावाने सक्षमची हत्या केली होती. संध्याकाळी ५ वाजून २० वाजण्याच्या सुमारास सक्षम ताटे याला मुलीच्या वडिलांना बोलावून घेतले होते. याठिकाणी आल्यानंतर गजानन मामीलवाड, साहिल मामीलवाड आणि अन्य तिघांनी मारहाण करुन त्याची हत्या केली. या घटनेमुळे नांदेडमध्ये एकच खळबळ उडाली होती.

या घटनेनंतर सक्षम ताटे याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते. त्यावेळी त्याची प्रेयसी आंचल मामीलवाड हिने एक अनपेक्षित कृती केली. ती सक्षमच्या अंत्यसंस्कारासाठी त्याच्या घरी गेली होती. तेव्हा तिने सक्षमच्या मृतदेहासमोर लग्नाचे काही विधी केले. तसेच तिने सगळ्यांदेखत कपाळावर सक्षमच्या नावाचे कुंकू लावले. हा प्रसंग पाहून उपस्थितांच्या मनात कालवाकालव झाली. सक्षमचा मृतदेह घरी आणताच तिने टाहो फोडला. अंत्यविधीपूर्वी तिने हळद आणि कुंकू लावून घेतलं शिवाय कपाळावर कुंकू भरले. यावेळी सक्षमला देखील हळद लावण्यात आली. हा प्रसंग पाहून उपस्थितांना अश्रू अनावर झाले होते.

सक्षम आणि आंचल याचे गेल्या तीन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. मात्र, सक्षम वेगळ्या जातीचा असल्याने हे प्रेमसंबंध आंचलच्या घरच्यांना मान्य नव्हते. सक्षम ताटे जेलमधून सुटून आल्यानंतर माझ्या कुटुंबातील लोक त्याच्या खूनाचा कट रचत होते, असे आंचलने सांगितले. आमच्या प्रेमसंबंधाला विरोध असल्याने माझ्या वडिलांनी आणि भावाने सक्षमला मारले पण ते हरले आणि माझा प्रियकर मरून पण जिंकला. आपल्या वडिलांना आणि भावाला फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणीही आंचलने केली आहे. पोलिसांनी आंचलचे वडील गजानन मामीलवाड यांच्यासह पाच जणांना पोलिसांनी अटक केली आहे. जयश्री मदनसिंह ठाकूर,गजानन बालाजीराव मामीलवाड,साहील ठाकूर,सोमाश लखे, वेदांत अशी आरोपींची नावे आहेत.

## इथं १५० कोटींचा घपला झालाय, आम्ही कारवाई करतोय




**दि.२९, बीड :** राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून बडे नेतेही प्रचाराच्या मैदानात आहेत. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री प्रचार दौरे करत असून बीड नगरपालिकेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ बीड शहरातील बशीरगंज भागात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जाहीर सभा संपन्न झाली. येथील सभेला राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते नवाब मलिक यांची उपस्थिती होती. मात्र, या सभेला आमदार धनंजय मुंडेंची अनुपस्थिती असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. येथील सभेतून अजित पवारांनी विकासावर भाष्य करताना बीडमधील गुन्हेगारी, भ्रष्टाचार, शहराची दुर्दशा यावर भाष्य केलं. तसेच, इथे १५० कोटींची गफळा झालाय, याप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाई करेल, असा इशाही अजित पवारांनी बीडमधून दिला.

बाकीच्या जिल्ह्यामध्ये विकासाला निधी दिल्यानंतर विकास होतो. पण, आपल्या इथं काहीच होत नाही, क्रिडांगण नाही, जॉगिंग ट्रॅक नाही. मागच्या काळातला निधी चांगल्या पद्धतीने खर्च झाला नाही, त्याबाबतची माहिती घेण्याचं काम सुरू आहे, त्याची चौकशी लावलेली आहे. इथं दीडशे कोटी रुपयांचा गफळा झालाय असं समोर आलंय, याप्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर आम्ही कारवाई करतोय. मात्र, ही खूप मोठी साखळी आहे, असे अजित पवार यांनी म्हटले. इथलं जे नेतृत्व होतं ते कमी पडलं, बीडमधल्या विविध पतसंस्थांमध्ये ६ ते ७ कोटी अडकले आहेत. अनेकांनी आत्महत्या केल्या, ज्यांच्यामुळे आत्महत्या केल्या, त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे. इथे कुणी दुर्लक्ष केलं कोण कमी पडलं? जे इथलं नेतृत्व करतात त्यांना कळत नाही. एका परिवाराच्या हातात हे दिलं आहे. तुम्ही माझ्या हातात ५ वर्ष द्या, असे आवाहन अजित पवारांनी येथील जनतेला केला. दरम्यान, बीडमध्ये सभा सुरू असताना अजान सुरू झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपले भाषण थांबवले होते. तुमचं माझं जे काही बरं वाईट होईल ते या बीडमधून होणार आहे. नसेल निवडून द्यायचं तर राहा मागं, काय माझ्या बापाचं, काकाच जातंय, असेही अजित पवारांनी म्हटले

## संपादकीय

### डॉ.नागनाथ कोत्तापल्ले



मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचा आज स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते.

मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोतापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# सफर कर्नाळ्याची- कर्नाळा किल्ला




## भाग : ०२

कर्नाळा येथील पक्षी अभयारण्यातील सखल पृष्ठभागावरील निसर्गरम्य वातावरणात बसून थोडंसं रिफ्रेशमेंटसाठी महिला बचत गटाच्या कॅन्टीनमध्ये वडापाव व गरमागरम चहा घेतला. शरीर व मन ताजेतवाणे झाल्यावर कर्नाळा किल्लावर जाण्याचे ठरवले.हा किल्ला इतिहासाचा मूर्तिमंत साक्षीदार आहे.किल्लयाची उंची समुद्रसपाटीपासून ४४५ मीटर इतकी आहे अर्थात सुमारे १५०० फुट एवढी उंची आहे. किल्लयाचा विस्तार क्षेत्रफळाच्या दृष्टीने सुमारे ४४६ चौ.कि.मी इतका आहे. ऐतिहासिक नोंदीनुसार सुमारे बाराशे वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत कर्नाळा किल्लयाने अनेक स्थित्यंतरे पाहिले आहेत. भोज,शिलाहार व देवगिरीच्या यादव घराण्याचा सुवर्णकाळ जसा पाहिला तसाच परचक्रांच्या टाचाखाली घोर अंधकारात सुमारे तीनशे वर्ष पिचत गेलेला हाताश महाराष्ट्रही त्याने पाहिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेचा सोहळा पाहत असताना दीडशे वर्षात मराठ्यांचे भीमथडीच्या तट्टाणीला यमुनेचे पाणी पाजून अटकेपार दौडत जातांनाही पाहिले.इंग्रजांचा भारतावर युनियन जॅक फडकला हे पारतंत्र्य ही त्यांनी समर्थपणे पचवले आणि आज स्वतंत्र भारतातातील महाराष्ट्रही तो पाहतो आहे.

कर्नाळा किल्ला वर बघायला जाण्यासाठी तेथे चौकशी केली असता तेथील वन विभागाच्या कर्मचारी यांनी दिशा दाखवली. आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे किल्लयाच्या दिशेने गेलो.तेथे हिरव्यागार पाटिवर कर्नाळा किल्लयाकडे जाण्याचा मार्ग असे लिहले आहे.वाचून बाणाच्या दिशेने वर चालत गेलो.बाजूलाच सूचनाफलक आहे.त्यावर वन्य प्राण्यांना त्रास देऊ नये.पर्यावरणाची काळजी घ्या. कचरा टाकू नका वगैरे.हे वाचून समोर चालत असतांना तेथील वास्तव्यास असणाऱ्या प्राण्यांचे चित्रासहित फलक लावलेले आहे.हेसुद्धा वाचत वाचत एक ते दोन मिनिट सखल भाग चालत जाऊन चढाईचा रस्ता चालू झाला.पूर्वी चढाईसाठी काळ्या पाषाणाच्या भल्या मोठ्या पायऱ्या बनवलेल्या असाव्या.परंतु त्यांची पूर्ण पडझड झालेली दिसून आली.थोडेसे चालत गेल्यावर घनदाट जंगल चालू झाले. साधारण दुपारच्या साडेअकराची वेळ होती.परंतु वृक्षांच्या विराट अशा फांद्यांनी रस्तावरील भाग सावलीने पूर्ण मंडप अच्छादल्या सारखं भासत होतं.जागोजागी काळे पाषाण आहे.पक्षांचे वेगवेगळे आवाज येत होते.माकडे झाडांच्या फांद्यांवर उड्या मारत होते.काहीशा आशेने आमच्याकडे बघत होते.बहुतेक! पर्यटकांनी त्यांना हरभरे-फुटाणे, मुगडाळ, बिस्किट,कुरकुरे यांची तोंडाला चटक लावली असावी.म्हणूनच रानातील मेव्याऐवजी त्यांनाही जणू आपल्यासारखं या पॅकिंगच्या खाद्याची आवड लागलेली असावी.तितक्यात चालून थकल्यानंतर थोडंसं क्षणभर थांबून उभ्यानेच मोकळा श्वास घेतला.तितक्यात वन्य विभागाने ट्रेकरसाठी अल्प विसाव्यासाठी बसवलेल्या बाकाजवळ एक गुलाबी लालसर तोंडाचे माकड डाव्या हातात काही फुटाणे व शेंगदाणे खातांना दिसले.ते माणसासारखेच दोन्ही हातांच्या मुठीमध्ये एकेक दाणा घेऊन खात होते.खातेवेळेस हातातून काही दाणे पडत होते,मात्र पडलेल्या दाण्यावर त्याचे बारकाईने लक्ष होते.ते परत वेचून-वेचून खात होते.हे नयनरम्य दृश्य पाहून आम्हीही बाकड्यावर बसलो.कारण दगडीवाटा व डोंगराळ भागातून चालत आल्यामुळे थकवा जाणवत होता.त्यानिमित्ताने माकडाचे हे मनमोहक दृश्य भ्रवणध्वनीमध्ये टिपले.वनातील रस्त्याच्या दूतर्फा असलेल्या वृक्षांच्या,पक्षांच्या,पानांच्या, फुलांच्या माहितीविषयी पाट्या लावलेल्या होत्या. त्या वाचत-वाचत नव्या दमानं पुन्हा किल्ला चढाईसाठी सज्ज झालो.

कर्नाळा किल्लयाच्या या चढाईच्या वाटेवर वृक्षांच्या वाळलेल्या पानांचा ढीग साचलेला होता.बारीक छोटे-मोठे गोल,चौकोनी तर काही गुळगुळीत गोटे होते.पावसाळ्यातील वरून वाहत आलेल्या पावसामुळे झाडांच्या मुळाजवळील माती झिजून वाहून गेलेली होती. त्यामुळे झाडांचे मुळे उघडे पडून इतरत्र पसरलेले होते.त्या गर्द झाडीमध्ये झाडांच्या मुळांच्या फांद्यांची अशी गुंतागुंत झालेली होती,कि नेमकं कोणते मूळ कोणत्या झाडाचे हे कळत नव्हते.लोंबकाळलेली मुळे व विस्तीर्ण झाडांच्या फांद्या याच दगडी अन अवघड रस्त्यातून वर चढण्यास मदत करत होत्या.रस्त्याच्या दूतर्फा लोंबकळणाऱ्या फांद्या अन झाडांची मुळं जणू वर चढाईस मायेचा हात देत होते.व सांगत होते की,घाबरू नकोस, खचून जाऊन नको. आम्ही संगतीला आहोत.म्हणून घामानं घामाझोकाळ झालेल्या शरीराला अन मनाला उभारी येत होती.काही काळे दगड तर एवढ्या मोठ्या आकाराचे होते की,त्यांच्याआड उभे राहिल्यास व्यक्ती दिशेनासा व्हायचा.थोडंसं अंतर कापल्यावर काही सखल भाग सुद्धा यायचा,तेव्हा मात्र थकलेल्या शरीराला थोडासा मोकळा श्वास घेण्यास उसंत मिळायची.हिरवीगार झाडे-झुडपे मनाचा उत्साह किल्लयाच्या अगदी वरील टोकापर्यंत जाण्याची जिद्द निर्माण करत होते.तेथेच काहीशा अंतरावर पूर्णतः पर्णहीन वृक्ष दिसला.त्या वृक्षाकडे बघून वाटले, एवढ्या हिरव्यागार वनामध्ये तू एकटाच का बर पर्णहींन?परंतु सृष्टीच्या नियमानुसार जशी उत्पत्ती तसा शेवटही निश्चितच..!मात्र त्याच्या अख्या आयुष्यामध्ये त्याने गार सावलीने कित्येकांना सुखावले असेल.हा त्याच्या अंगी असलेला परोपकारी भाव मनात घर करून गेला. अन मनाला वाटले की,जन्माला येऊन कुठेतरी समाजहिताचे कार्य करावे. तेही अगदी निस्वार्थ भावनेने.कुठलीही अपेक्षा न ठेवता. अगदी त्या पर्णहीन वृक्षासारखं...!क्षणभर थांबून त्याला नमस्कार केला अन पुढील वाट चालण्यास निघालो.काही सकल तर काही दगड-गोट्यांच्या दलदलीतील वाटा पार करत साधारण एक किलोमीटरचा प्रवास पार केल्यावर एक विशांती स्थळाचा पॉईंट दिसला.तेथे गोल घुमटाकार उतरत्या छपराचे छत बनवलेले आहे.छताखाली चारी बाजूंनी बाकडे बसवलेले आहे. तेथे किल्लयाकडे जाणारे व येणारे किल्लेप्रेमी,पर्यटक,ट्रेकर येऊन बसतात.यावरूनच वाटतं कि,जणू ते अगदी योग्य ठिकाणी बसवलेले आहे. कारण एकदम छातीवर येणारा चढाईचा प्रवास करून व्यक्तीला नक्कीच थकवा येतो व तेथे क्षणभर विसावा घेतल्यास मनाला व शरीराला ताजेतवाने वाटते.

या विशांती स्थळाजवळ तीन वाटा आहेत.त्यातील ज्या मार्गानं खालून वर चढत येण्याची एक.बाकी दोन अश्या कि त्यातील एक डावीकडे दुसरी उजवीकडे जाणारी.त्यातील डावीकडील जाणारी वाट ही साधारण शंभर ते दीडशे मीटर चालत गेल्यावर प्रतिबंधित होती. कारण त्या दिशेने भयानक घनदाट जंगल,झाडे-झुडपे,उंच डोंगररांगा व भल्या मोठ्या दऱ्या होत्या. त्यामुळे तिथून परत येऊन उजव्या बाजूला सकल भागावर चालू लागलो.या रस्त्याने फक्त पाऊलवाट होती.रस्त्यावरील अनावश्यक गवत साफ करून रस्ता मोकळा केलेला होता. चालतांना मनात विचार यायचे की,नेमकं किल्ला कुठे आहे. खाली बघितलेल्या किल्लयाच्या चित्रावरून त्या स्वरूपाचे काहीच नजरेस पडत नव्हते.मनाला वाटायचे की,कदाचित रस्ता चुकलो.कारण तिथून वर बघितल्यास किल्ला मोठमोठ्या झाडा-झुडपांमध्ये दडलेला दिसत होता.मात्र किल्लापर्यंत जाण्याची जिद्द मनामध्ये घट्ट धरून ठेवलेली होती.थोडे अंतर चालत गेल्यावर पुन्हा जोरदार चढाईचा रस्ता लागला.चढते वेळेस उजव्या बाजूला दोन्ही झाडांच्या घनदाट फांद्यांच्या पोकळीतून एक अंगठ्याच्या आकारासारखा बुरुज दिसला.तेव्हा कुठे जीवात जीव आला.कारण मनात जे लक्ष ठेवून होतो ते पूर्णत्वास येणार होते.म्हणून परत नव्या दमाने चढाईला सुरुवात केली. परत थोडासा सखल भाग लागला.तेथे बारीक पिवळसर वाळवले गवत रस्त्याच्या दुतर्फा पसरलेले होते.तेथून हाकेच्या अंतरावर उजव्या हाताला एक छोटसं कर्नाई मातीचे देवीचे मंदिर आहे. मंदिराच्या डाव्या बाजूकडील संगमरवरी फरशीवर माननीय शिवसेनाप्रमुख कै.बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते श्री कर्नाई माते

ची पुनर्रस्थापना सोमवार दिनांक २९ एप्रिल १९७४ रोजी करण्यात आली होती व त्यानंतर परत जवळपास पंधरा वर्षानंतर अर्थात ११ जून १९८९ रोजी पनवेल शिवसेना शाखेमार्फत मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे.त्या संदर्भातील बोर्ड मंदिराच्या उजव्या बाजूला लावण्यात आले आहे.मंदिरात कर्नाई आईची पाषाणाची मूर्ती आहे.त्या दिवशी आईला कोरी करकरीत हिरवीगार साडी नेसवलेली होती.अखंड दगडी पाषाणामध्येच हातात कोरीव काम करून शस्त्र बनवलेले आहे.आईचा स्मित हास्यमयी चेहरा,मोठमोठे डोळे व दगडाचेच भव्य मुकुट आहे.कपाळावर छान गोलाकार कुंकू लावलेले होते.भारदस्त चेहरा व सुंदर अशी पाषाणातील आईची आकर्षक मूर्ती मन वेधून घेते.

कर्नाई आईच्या मंदिराच्या उजव्या बाजूलाच एक भल्या मोठ्या वृक्षाच्या फांदीला एक फलक लावलेले आहे.त्यावर, नमस्कार शिवभक्तांनो,या शिवतीर्थावर आपले स्वागत. या पवित्र स्थळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समयसूचकता या गुणांचे स्मरण करा जय भवानी जय शिवराय.असे हे छानसे फलक दीड बाय तीन फुट आकारात फोटोफ्रेमप्रमाणे बनवलेले आहे.ते वाचून खरोखरच छत्रपती शिवरायांच्या कार्यांची आठवण होते. त्यांच्या समयसूचकता या गुणांची ओळख पटते.बाजूलाच लोखंडी पाईपाने बनवलेल्या व लोखंडी पत्र्याच्या फलकावर सशस्त्र क्रांतीचे जनक आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचा काळीशार दाढी,तेजस्वी डोळे,धारदार नाक पांढरे वस्त्र परिधान केलेला अन हातामध्ये बंदूक घेतलेला फोटो लावलेला आहे.त्याखाली जन्मतारीख व मृत्यू तारीख लिहिलेली आहे.या ठिकाणावरील वासुदेव बळवंत फडके यांच्या फोटोमागील विशेष असे की,त्यांचे आजोबा हे त्या किल्लयाचे किल्लेदार होते व या किल्लयाच्या ज्वलंत संघर्षातूनच त्यांना क्रांतीची प्रेरणा मिळाली होती. अशी इतिहासात नोंद आहे.

कर्नाई आईच्या मंदिर परिसरातील सखल भागावरून किल्लयाचे सर्वोच्च टोक दिसते.मात्र चढाई खूप कठीणाईची आहे.अक्षरश: मोठ-मोठे दगड,दगडाच्या तुटलेल्या पायऱ्या,त्यामुळे चढण्यास कठीण आहे.बाजूला खोल दऱ्या आहे,म्हणून संरक्षणासाठी लोखंडी ग्रील लावलेल्या आहे.त्यांना हाती धरून त्यांच्या साह्याने एक-एक पाऊल टाकत किल्लयाच्या पायथ्यापर्यंत पोहोचलो.किल्लयाची मुखद्वाराची भिंत ही काळ्याशार दगडांनी बनवलेली आहे. पिंपळवृक्षाचे मुळं हे भिंतीमध्ये घुसलेले दिसून येते.मात्र ते भव्य झाड जिवंत आहे. दगडाच्या नक्षीदार भव्य कामानीला सागवानी लाकडाचा भव्य दरवाजा आहे.त्या दरवाज्यावर छान नक्षीकाम आहे.पितळीच्या कडी-कोंड्या आहेत.व विशेष असे की,अनुकुचीदार असे पितळीचे मोठमोठे खिळे आहेत. की जे शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी लावलेले असावे अथवा वन्यप्राणी दरवाजा ढकलून प्रवेश करू नये यासाठी लावलेले असावे. जवळपास तेरा दगडी पायऱ्या चढल्यावर किल्लयांचा वर सकल भाग दिसून येतो.उजव्या बाजूला पंचवीस ते तीस फूट उंचीच्या लोखंडी पाईपाला भव्य भगवा ध्वज आहे. तो वाऱ्याने अतिशय डौलात फडकत होता.मनाला राहवले नाही छत्रपती शिवरायांची आठवण झाली अन लवून मुजरा केला.चारी बाजूंनी भल्या मोठ्या दगडांच्या संरक्षक भिंती आहे.डाव्या बाजूला काही पडक्या खोल्या आहेत. त्याचे भग्न अवशेष दिसून येतात.जागोजागी पाण्याचे हौद आहे.त्या हौदामध्ये अजूनही पाणी दिसून येते.मात्र हिरवी पाने,वाळलेले गवत पडून पाणी हिरवे झालेले दिसून येते.

संरक्षण म्हणून वरील बाजूने लोखंडी जाळ्या बसवलेल्या आहे.वरील सखल भागावर सुद्धा काही पायऱ्या चढउतारासाठी आहेत.थोड्या-थोड्या अंतराने दगडी पाषाणातील दरवाजे आहे.त्या चढून-उतरून किल्लयांच्या इतर ऐतिहासिक वास्तू दिसतात.त्यामध्ये विशेषतः दगडी कोरीव खांब आहे. दरवाज्याचे नक्षीकाम,छोट्या खोल्या व चारी बाजूने पूर्ण तटबंदी बांधकाम आहे.मात्र त्यातील काही भाग ढासाळलेला असल्यामुळे पर्यटकांच्या व किल्लेप्रेमींच्या संरक्षणासाठी प्रतिबंधित अर्थात प्रवेशास बंद केला आहे.अशा या कर्नाळा किल्लयाच्या अगदी टोकावरील भागापर्यंत पोहोचलो की जे खालून अंगठ्याच्या आकाराचे दिसत होते.प्रत्यक्षात जवळून त्याचा आकार शंभर ते दीडशे फुट एवढ्या गोलाकारातील त्रिज्ये इतका असावा व उंची जवळपास शंभर फुट इतकी असावी.व तेथील सखल भागावरील परिसर जवळपास एक ते दीड एकराचा असावा.तेथे काही बाभळांची झाडे,बोरीचे बारीक झुडपे,गवत आढळून आले.त्या सर्वोच्च टोकावरील भागावरून चहूकडे बघितले,तर हिरव्यागार डोंगररांगा दिसतात. अतिशय दूरचे जलाशय दिसते.पनवेल हे शहर झाडाझुडपांच्या गर्दीत पूर्णतः गुडूप झालेले दिसत होते.मात्र काही उंच इमारती माचीसच्या काडीसारख्या भासत होत्या. तेथेच एका भागावरून दुसऱ्या सखल भागावर जाण्यासाठी लोखंडी पाईपाचा अन जाड लोखंडी पत्र्यांचा वापर करून छोटासा पुल बनवलेला आहे.आठ ते दहा पायऱ्या उतरून पुलावरून दुसऱ्या सखल भागावर पोहोचल्यावर किल्लयाचा या सखल भागांचा शेवट दिसून येतो. तेथे संरक्षणासाठी तटबंदी भिंती बांधल्या आहेत. या भिंतीवरून डोकावून बघितल्यास पूर्ण खोल दऱ्या आहेत.बघून डोळे गरगर फिरायला लागतात.मात्र निसर्गरम्य वातावरण मन वेधून घेते. तेथील सखल भागावर ठाणे वन्य विभागाने पर्यटकांना बसण्यासाठी बाकडे बसवलेले आहेत.आम्ही सर्व फिरून झाल्यावर थोडासा विसावा म्हणून एका बाकड्यावर बसलो.बॅग मधील बिस्कीटचे पुडे व दोन-दोन चॉकलेट खाल्ले व नेहमीप्रमाणे हातातील बिस्कीटचे पुड्यांचे रॅपर खाली टाकले.मात्र तेथील स्वच्छता बघून तत्क्षणी आठवण झाली त्या प्लॅस्टिक डिपॉझिटच्या रक्कमेची व नियमांची...!

कर्नाळा किल्लयाची चढाई,तेथील दगडी रस्ते,अवघड वाटा जंगली वने हे थोडे अवघड वाटले.दमछाक झाला. परंतु किल्लयावर येऊन तेथील सौंदर्य,पाऊलवाटा,निसर्गवाटा किल्लयांचे नक्षीकाम,सागवानी दरवाजा,पाण्याचे हौद,मोठ्मोठ्या पायऱ्या,दगडाच्या संरक्षक भिंती भुयारीमार्ग हे सर्व बघून मन अगदी तृप्त झाले.काही वेळ विसावा करून साधारण दुपारच्या दोन वाजता परतीच्या वाटेवर निघालो. कारण वन विभागीय अधिकारी यांनी परतीची सायंकाळी पाच वाजेची वेळ दिलेली होती.कारण हिवाळ्याची चाहूल लागल्यावर सूर्यास्त लवकर होतो व जंगलामध्ये सर्वदूर अंधार पसरतो.वन्यप्राणी रस्त्यावर येतात. त्यामुळे पर्यटकांना धोका निर्माण होऊ शकतो. परतीच्या वाटेवरून येतांना, निसर्ग वाटा,दगडीवाटा चालतांना जणू कुणीतरी पाठीमागून ढकलते की काय?असं वाटू लागलं कारण उतारामुळे उतरणे व चालणे सहज शक्य व्हायचं.त्यामुळे जातेवेळी जेवढा वेळ लागला त्याच्या निम्म्या वेळेतच खालपर्यंत पोहोचलो व खाजगी वाहनाने पनवेल स्टेशन पर्यंत आलो.

अशाप्रकारे कर्नाळा पक्षी अभयारण्य व किल्लयाच्या चढाईचा व उतराईचाप्रवास अतिशय छान वाटला. या ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन आनंद झाला. मन तृप्त झाले. तेथील निसर्गरम्य वातावरण,झाडे-झुडपे,वृक्षवेली,प्राणी-पक्षी यांच्या सहवासात पूर्ण दिवस या प्रदूषणाच्या वातावरणातून एका अल्हाददायी दुनियेत जगल्यासारखं वाटलं. एवढ्यात चढउताराच्या डोंगराच्या वाटा चढून उतरूनही अजिबात थकवा जाणवला नाही. कारण तेथील शुद्ध हवेचा प्रत्येक क्षण हा शरीराला व मनाला ताजेतवाने करणारा होता.मित्रांनो, या धावपळीच्या दुनियेत आठवड्यातून नाही शक्य झाले तरी, किमान महिन्यातून एकदा तरी अशा या प्रेक्षणीय स्थळांना,ऐतिहासिक स्थळांना अवश्य भेटी द्या.आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी आपल्या संस्कृतीचा बहुमूल्य ठेवा आपल्या पदरात टाकला आहे.त्याचे जतन करूया. गड, किल्ले,अभयारण्य,प्रेक्षणीय स्थळे यांना प्रदूषणमुक्त करूया व भावी पिढीलासुद्धा आपल्या भारतीय संस्कृती व ऐतिहासिक वारस्याचे महत्व पटवून देऊया.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

# सरकारने शाश्वत विकासाला प्राधान्य देणे गरजेचे !

सद्या पालिका, महानगरपालिका निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील सर्वचं पक्षांची जोरदार तयारी सुरु आहे. त्यामुळे सगळीकडे निवडणुकीचा ज्वर वाढत आहे. आगामी काळात पंचायत समिती आणि जिल्हा पंचायतीच्या निवडणूका होणारं आहेत. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना कार्यान्वित केली आहे लाभार्थीं महिलांच्या खात्यात दरमहा १५००/- रुपये देणारी ही योजना महाराष्ट्रात चांगलीचं चर्चेत आली असली तरी प्रामुख्याने जिवनावश्यक वस्तूंचे भाव कमी करणे गरजेचे असताना सरकारने महिलांना १५००/- रुपये देवून बोळवण केली आहे. सद्या झपाट्याने अनेक वास्तूंचे भाव गगनाला जावून भिडले आहेत. काही ठिकाणी अतिवृष्टी तर कुठे दुष्काळ सदृष्टस्थिती यामुळे अनेक पिकांना फटका बसला आहे. याच्याकडे सरकारचे लक्ष नाही फक्तं आणि फक्तं निवडणूका डोळ्यासमोर ठेवून मतांचा जोगवा मागण्यासाठी असल्या योजना कार्यान्वित केल्या जात आहेत का? लाडक्या योजनेच्या मुद्यावरुन अनेक नेते विविध सभेतून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. नेटकॅफेमध्ये ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी महिलांना तासन् तास ताटकळत रहावे लागते आहे. त्यामुळे महिलांच्या कामाचे नियोजन कोलमोडले असून सरकारने असल्या योजना राबवण्यापेक्षा शाश्वत विकासाचे सार्वजनिक प्रश्न सोडवले पाहिजेत हि योजना ज्या महिला पात्र आहेत त्यांना लाभ मिळणारं आहे मग अपात्र आहेत त्यांचे काय ? तमाम महाराष्ट्रातील जनता लाडकी नाही काय ? असा देखिल सवाल विचारला जात आहे. त्यासाठी सरकारने सार्वजनिक कामाला प्राधान्यक्रम देणे कधीही हिताचे ठरणारं आहे आज महाराष्ट्रात महागाई, खून, बलात्कार, भ्रष्टाचार, अपघात, मारामारी, बेरोजगारी असले प्रकार वाढत असताना सरकार फक्तं निवडणूकीचा विषय घेवून सभा, विविध कार्यक्रमांचे इव्हेंट यामध्येचं गुंतले आहे. त्यामुळे लोकप्रिय योजना राबवली म्हणजे जनतेचे प्रश्न सुटले असा त्याचा अर्थ होत नाही म्हणूनचं सद्याची निवडणूक सत्ताधाऱ्यांना सोपी राहिलेली नाही.

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## गुराख्यावर वाघाचा हल्ला ; गुराखी ठार ! चंद्रपूर हादरले

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात मानव-वन्यजीव संघर्ष शिगेला पोहचला असून आज २९ नोव्हेंबर ला चंद्रपूर वनविभागाच्या हद्दीत जनावरे चारण्यासाठी गेलेल्या गुराख्यावर वाघाने हल्ला करीत ठार केले. चालु वर्षातील वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातील ही ४१ घटना असून यामध्ये आत्तापर्यंत वाघाच्या हल्ल्यात ३७, बिबट्याच्या हल्ल्यात २, हत्ती व अस्वलाच्या हल्ल्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

आज सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास चंद्रपूर वनपरिक्षेत्रातील चिचपल्ली रेंज कंपार्टमेंट क्रमांक ६९६ मध्ये मंदा तुकुम गावातील रहिवासी ५५ वर्षीय रमेश नागो बोमनवार हे नेहमीप्रमाणे गुरे चारण्यासाठी गेले होते. मात्र, त्याठिकाणी दबा धरुन बसलेल्या वाघाने बोमनवार यांच्यावर हल्ला करीत ठार केले. घटनेची माहिती वनविभागाला मिळाल्यावर त्यांनी तात्काळ घटनास्थळ गाठत पंचनामा केला. नियमानुसार मृत गुराख्याच्या कुटुंबाला वनविभागातर्फे आर्थिक मदत देण्याची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

विभागीय वनाधिकारी राजन तलमले यांनी परिसरातील नागरिकांना आवाहन केले आहे की, वन्यप्राण्यांच्या हालचाली लक्षात घेऊन अशा संवेदनशील वनक्षेत्रात एकटे फिरणे टाळावे आणि सतर्कता बाळगावी. वन्यप्राण्यांबद्दल कोणतीही माहिती असल्यास त्वरित वनविभागाला कळवावी.

## संविधानदिन निमित्ताने अंगणवाडीला साहित्य वाटप

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव मशिद येथे परंपरेनुसार संविधान दिन ग्रामपंचायत कार्यालयात साजरा करण्यात आला.




संविधान दिनाचे औचित्य साधुन ग्रामपंचायतीच्या वतीने मागासवर्गिय १५% खर्चाअंर्तगत गॅस शेगड्याचे वाटप करण्यात आले. तसेच १०% खर्चाअंर्तगत महिला बाल कल्याण अर्तगत अंगणवाडीला साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती मध्ये पारनेर तालुका भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, रांजणगावचे सरपंच संध्याताई महेश देशमुख, उपसरपंच शिवाजी शिंदे, महेश देशमुख, ग्रामपंचायत अधिकारी गायकवाड साहेब, प्रा.चंद्रकांत शिंदे, तात्याभाउ निर्वाण, विकास गाढवे(मेजर) सर्व ग्रामपंचायत सदश्य, सर्व सेवा संस्थाचे पदाधिकारी, सर्व ग्रामस्थ, सर्व अंगणवाडी सेविका मोठ्या संख्ेने उपस्थित होत्या.

## पनवेल मनपाच्या सर्व प्रभागात रस्ते दुरुस्तीच्या कामांना वेग

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, पनवेल :** महापालिकेच्या खारघर, कामोठे, पनवेल, कळंबोली अशा सर्व प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य देऊन, युद्धपातळीवर रस्ते दुरुस्तीची कामे सुरू आहेत. रस्ते दुरूस्तीच्या कामामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या आदेशानूसार चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीची कामांवर बांधकाम विभागाने लक्ष केंद्रीत केले आहे.



नागरिकांची गैरसोय होऊ नये, महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील रस्ते दुरुस्तीची कामे वेगाने व्हावी यासाठी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे स्वतः विविध ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन कामाची पाहाणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत आहेत.

शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागामध्ये कनिष्ठ अभियंत्यांच्या देखरेखीखाली रात्रंदिवस रस्ते दुरुस्तीची कामे केली जात आहे. सध्या कळंबोलीमध्ये सेक्टर १७, सेक्टर १, रोडपाली, खारघरमध्ये बेलपाडा हायवे सेक्टर १२ मध्ये ग्रीन फिंगर शाळा, कामोठ्यामध्ये सेक्टर १२ मध्ये, मानसरोवर स्टेशन मेन रोड, सेक्टर ३, नवीन पनवेलमध्ये शिवा कॉम्प्लेक्स अशा विविध ठिकाणी रस्ते दुरुस्तीची कामे वेगाने सुरू आहेत.

## भाजपचा एखादा नगरसेवक निवडून आला तर खूप झालं

### जळगावात भाजप अन् शिवसेनेत जुंपली

**दि.२९, जळगाव :** राज्यातील काही नगरपालिकांमध्ये शिवसेना महायुतीमध्ये गडबड झाल्याने स्थानिक स्तरावर निर्णय घेऊन भाजप विरुद्ध शिवसेना असाच सामना रंगला आहे. त्यामध्ये, जळगाव जिल्ह्यातही राजकीय वातावरण तापले असून भाजप आणि शिवसेना नेते आमने-सामने आले आहेत. दोन नंबर धंदे करणारा आमचा एक जरी उमेदवार उभा असेल तर त्यांनी नाव घेऊन सांगावं, मी समोरच्याला बिनविरोध करेल. खोटं बोलायचं, लोकांची बदनामी करायचं हे काम भाजप करत आहे, अशा शब्दात शिवसेना शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना प्रत्युत्तर दिले.

जळगावातील भाजप आमदार किशोर पाटील यांनी भाजप प्रदेशाध्यक्षांच्या वक्तव्यावरुन पटलवार केला. तसेच, भाजप आमदार मंगेश चव्हाण यांच्यावरही बोचरी टीका केली. आमचा एकही नगरसेवक निवडून येणार नाही असे म्हणणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखं सारख आहे. भाजपचा एखादा नगरसेवक निवडून आला तर खूप झालं. माझं भाजपला चॅलेंज आहे, भडगाव, पाचोरा या दोन्ही नगरपालिकेवर शिवसेनेचाच भगवा फडकेल. रवींद्र चव्हाण यांनी युती टिकवायची की नाही, हा महाराष्ट्राचा विषय आहे. परंतु, युती टिकवायची नाही हे मी १ नोव्हेंबरलाच जाहिर केलेलं आहे, असे म्हणत किशोर पाटील यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. गद्दारांशी दोस्ती करून पाठीत खंजीर खुपसून घेण्यापेक्षा एकदा दूध का दूध पाणी का पाणी होऊन जाऊ द्या, असेही त्यांनी म्हटले.

चाळीसगाव नगर परिषदेत शिवसेनेचे शिंदे गटाचे जे उमेदवार उभे आहेत, त्यांना महाविकास आघाडीकडून उभं करण्याचा माझा प्रयत्न होता. मी माझ्या लोकांच्या विरोधात चाळीसगावमध्ये आलो नाही तर महाविकास आघाडीच्या समर्थनार्थ इथे आलो आहे, असे म्हणत येथे त्यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा देत भाजपविरुद्ध भूमिका घेतली.

## नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमावर मतदान व मतमोजणी केंद्राभोवती निर्बंध; जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** राज्य निवडणूक आयोगांच्या निर्देशानुसार चंद्रपूर जिल्हातील बल्लारपूर, राजुरा, गडचांदूर, भद्रावती, वरोरा, चिमूर, ब्रम्हपुरी, नागभीड, मुल, घुग्घुस या नगरपालिकांमध्ये तसेच भिसी नगरपंचायतीत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी आचारसंहिता ४ नोव्हेंबर २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार असून, मतमोजणी दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता सुरु होईल. या अनुषंगाने कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आदर्श आचारसंहितेचे पालन सुनिश्चित करण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ नुसार जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी. सी. , यांनी विशेष निर्बंध लागू करण्याचा आदेश जारी केला आहे.

**प्रतिबंधातून सूट :-**

'डोअर टू डोअर' प्रचार (५ पेक्षा जास्त व्यक्ती जमण्यास मनाई), अँम्बुलन्स, दवाखान्यांच्या गाड्या, दूधगाड्या, पाणी टँकर, पोलीस, वीज, निवडणूक कर्मचारी यांची वाहने, दिव्यांग/ आजारी मतदारांना त्यांच्यै वैयक्तिक वाहनाने मतदानासाठी ये-जा, जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे हे आदेश दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आले असून, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना आदेशाचे व्यापक प्रसारण करण्याचे निर्देश दिले आहेत.

**१ डिसेंबर निर्बंध लागू होणार :-**

मतदान व मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात अनधिकृत जमाव, सार्वजनिक सभा, वाहनांची वर्दळ बंदी, भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे, प्रचार साहित्य यावर बंदी, मतदारांना ने-आण करण्यासाठी वाहने वापरण्यास मनाई करण्यात आली आहे.

मोबाईल, वायरलेस सेट इत्यादी मतदान केंद्रात नेण्यास बंदी, (अधिकृत कर्मचारी वगळता), धोक्यातील व्यक्तींना सुरक्षा दलासह १०० मीटर परिसरात येण्यास निर्बंध, मतमोजणी केंद्राबाहेरील १०० मीटर परिसरातील दुकाने, आस्थापना बंद, मतमोजणी केंद्राच्या परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेशबंदी, ड्रोन उडविण्यास सक्त मनाई राहणार आहे.

## कु.दुर्गा गुंजाळचे भारताला ३ सुवर्णपदक

### एनड्युरन्स स्केटिंग वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये देशाचा लौकिक

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२९, विंचूर (नाशिक) :** पुणे येथे २३ नोव्हेंबर २०२५ पुण्यातील प्रतिष्ठित कासारसाई (संत तुकाराम महाराज साखर कारखाना) येथील एल.के.टी.आंतरराष्ट्रीय स्केटिंग ग्राउंडवर २१ ते २३ नोव्हेंबर दरम्यान दिमाखात पार पडलेल्या एनड्युरन्स स्केटिंग वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५ मध्ये भारताची कन्या कु.दुर्गा दिलीप गुंजाळ हिने अभूतपूर्व कामगिरी करत ३ पदकांसह (दोन सुवर्ण, एक कांस्य) प्रथम क्रमांक पटकावला. अंडर-१२ गटात भारताचे प्रतिनिधीत्व करत तिने देशाचा झेंडा जागतिक पातळीवर उंचावला.




या भव्य जागतिक स्पर्धेत १२ पेक्षा अधिक देशांमधून चारशे पन्नासहून अधिक स्केटर्स सहभागी झाले होते. केनिया, संयुक्त अरब अमिरात, नेपाळ, मलेशिया, मालदीव, सौदी अरेबिया, फिलिपिन्स, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका, इजिप्त, थायलंड, सेनेगल या देशांच्या खेळाडूंनी मोठा सहभाग नोंदवला.

स्पर्धेतील विजेत्यांना पदके व प्रमाणपत्रे उपमुख्यमंत्री माननी एकनाथ शिंदेचे सहाय्यक मंगेश चिवटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. तसेच इंड्युरन्स वर्ल्डचे अध्यक्ष योगेशजी कोरे, सचिव दशरथ बंड, सहसचिव सतीश सिंग, प.पु.स्वामी वासुदेवानंदगिरी बहुरूपी महाराज यांनी दुर्गाचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

कु. दुर्गाला विसा स्केटिंग अकॅडम िचे प्रशिक्षक शाम चौधरी यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले. तिच्या या जागतिक यशाबद्दल विसा स्केटिंग अकॅडमी, जय जनार्दन अनाथ व वृद्ध आश्रम, सरस्वती विद्यालय (मुख्याध्यापक व कर्मचारीवृंद), तसेच एन.व्ही. पी. कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक, पंचक्रोशीतील मान्यवरांनी अभिनंदन वर्षाव केला.

लासलगावात परतल्यावर गावकऱ्यांनी दुर्गाचे जल्लोषात स्वागत केले. अनाथ आश्रमातील बालकांसह दिवाळी साजरी करत तिने आनंद वाटला. दुर्गा गुंजाळ ही आतापर्यंत तीन वेळा आंतरराष्ट्रीय विजेती ठरली असून तिच्या या कामगिरीबद्दल आई संगिताताई गुंजाळ यांनी तसेच गुरु शाम चौधरी सरांनी अभिमान व्यक्त करत तिचा सत्कार केला.

## समता परिषदेच्या वतीने महात्मा फुलेंना अभिवादन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** आज धर्मांध शक्तींना पराभूत करायचे असेल तर क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांची मदत लागणार आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका अध्यक्ष नवनाथ खामकर यांनी केले.

शहरातील महात्मा फुले पुर्णाकृती पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पारनेर तालुका समता परिषदेचे अध्यक्ष नवनाथ खामकर यांनी आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. आयोजक नवनाथ खामकर यांनी सांगितले की, लवकरच तालुक्यातील प्रत्येक गावात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद स्थापन करण्यात येणार असून समतेचा विचार घराघरात पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगत फुले यांच्या कार्याचा गौरव केला.



यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किसनराव रासकर, माजी सभापती खंडू भूकन, समता परिषदेचे तालुका अध्यक्ष नवनाथ खामकर, सामाजिक कार्यकर्ते शाहीरमामा गायकवाड, माजी नगरसेवक श्रीकांत चौरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष बाळू गायकवाड, विशाल क्षिरसागर, ओम क्षिरसागर, निखिल गायकवाड, विनायक लोंढे, संदिप गायकवाड, अमित जाधव,राजू शेख, नगरसेवक भूषण शेलार, पोपट काळोखे, दिलिप काळोखे,बाळू शिंदे, विजय मंडलिक, विकास झगडे,आकेश जमदाडे, अशोक गायकवाड, ऋषिकेश वाढवणे, अनिल साळवे, अविनाश कदम, प्रभाकर घोल आदी उपस्थित होते.

## वनकुटे येथे विविध विकासकामांचे भुमिपूजन आ.दाते यांच्या हस्ते संपन्न

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** वनकुटे गावात मंजूर झालेल्या विविध विकासकामांचे भूमिपूजन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आम दार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, वनकुटे गावात सर्व जाती-धर्माचे लोक वर्षानुवर्षे शांततेत आणि ऐक्याने नांदत आहेत. काही व्यक्तींनी वारंवार गावात भेद निर्माण करून जनतेच्या भावनांशी राजकीय खेळ खेळण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आता वनकुटेकरांनी जागृत होऊन काम करणाऱ्या लोकांना ओळखून त्यांना ठाम साथ द्यावी. लोकशाही व्यवस्थेत कर्तव्य पार पाडणाऱ्यांनाच अधिकार गाजविण्याचा नैतिक अधिकार आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी पोपट चौधरी, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष सुभाष सासवडे,भाजप जिल्हा सरचिटणी, सरपंच सुमनताई रांधवण, चेअरमन गणेश मुसळे, उपसरपंच बाजीराव काळनर, माजी चेअरमन काशिनाथ बुचूडे, आप्पासाहेब गागरे, भानुदास गागरे, डॉ. नितिन रांधवण, नारायण पाटील गागरे,स सुभाष दुधाडे, बी.टी.खामकर, भिमराज मुसळे, रामदास शेलार, ग्रामपंचायत सदस्य पोपट मेंगाळ, भास्कर पठारे, भास्कर शिंदे, भाऊसाहेब साळवे यांसह भिवा केसकर, ज्ञानेश्वर गागरे, कारभारी मुसळे, भिमराज मुसळे, अशोक पाटील गागरे यांसह स्थानिक पदाधिकारी, नागरीक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार दाते यांनी सांगितले की, स्थानिक पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मागणी केलेली कामे प्राधान्यक्रमाने पूर्ण केली जातीलच पण गावातील आदिवासी बहुल लोकसंख्या पाहता यापुढील काळात आदिवासी सुधार योजना, तांडा सुधार योजना, पुनर्वसनातील नागरिकांसाठी विशेष योजना तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न केले जातील. या भूमिपूजनांमुळे वनकुटे गावाच्या विकासाचा नवा टप्पा सुरू होणार असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



जि.प. शाळेतील दोन नवीन वर्ग खोल्या बांधकाम करणे - २४ लक्ष, बिरोबा मंदिर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे - १० लक्ष, स्मशानभूमी सुशोभीकरण करणे - १० लक्ष, हनुमान नगर (केसकर वस्ती) येथे सौर पथदिवे बसविणे - १० लक्ष, डॉ. बाबासाहेब वस्ती रस्ता कॉंक्रीटीकरण करणे - ५ लक्ष, चरपटीनाथ मंदिर परिसर पेव्हर ब्लॉक बसविणे - १० लक्ष, गोसावीबाबा मंदिर परिसर पेव्हर ब्लॉक बसविणे - १० लक्ष, महादेव मंदिर परिसर पेव्हर ब्लॉक बसविणे - १० लक्ष अशा एकुण ८९ लक्ष रुपयांच्या कामांचा शुभारंभ यावेळी करण्यात आला.

## नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक - कामगारांसाठी भरपगारी सुट्टी जाहीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, बुलढाणा :** जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा. म्हणून राज्य सरकारने त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

सरकारी कामगार अधिकारी मा. तु. जाधव यांनी कळविल्यानुसार मतदान क्षेत्रातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, हॉटेल्समध्ये काम करणाऱ्या कामगारांना भरपगारी सुट्टी देणे बंधनकारक आहे.

अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास, कामगारांना किमान २ ते ३ तासांची सवलत देणे आवश्यक आहे.

सुट्टी न दिल्यास संबंधित आस्थापना धारकांविरुद्ध कारवाई करण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व कामगारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावा, असे आवाहन जिल्हा कामगार विभागातर्फे करण्यात आले आहे.

# मतदानाच्या आधीच्या दिवशी रात्री १० पासून प्रचारबंदी लागू

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, ठाणे :** राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक आणि पोटनिवडणुकांमध्ये मतदानापूर्वी लागू असलेल्या निवडणूक प्रचार बंदीच्या नियमांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वाचा बदल केला आहे. विविध आदेश व अधिनियमांमध्ये भिन्न उल्लेख आढळत असल्याने या तरतुदी एकसमान करण्याच्या उद्देशाने आयोगाने प्रचार थांबविण्याची वेळ निश्चितपणे मतदानाच्या आधीच्या दिवशी रात्री १० पर्यंत केली आहे. ठाणे जिल्हयातील नगरपारिषदांचे मतदान दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी असल्याने सुधारित आदेशानुसार दि.०१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० नंतर सभा, मोर्चे, ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. प्रचार बंद होईल. अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' मधील कलम २३ नुसार मतदानाच्या दिवशी कोणतीही जाहीर सभा आयोजित करणे, भरविणे किंवा त्यात सहभागी होणे प्रतिबंधित आहे. मतदानादिवशी शांतता राखण्यासाठी ही तरतूद लागू आहे. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रसार माध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ मध्ये मतदानाच्या एक दिवस आधी रात्री १२ पासून प्रचारबंदी लागू असे नमूद होते. तसेच ०४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या 'आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश' मध्ये मतदानाच्या २४ तास आधीपासून प्रचारबंदीचा उल्लेख होता.

विविध आदेशांतील या वेळेतील फरकामुळे निवडणूक अधिकाऱ्यांमध्ये आणि उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होत होता. या सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोगाने ०४ नोव्हेंबर २०२५ च्या एकत्रित आदेशातील मुद्दा क्रमांक ६ (२) मध्ये सुधारणा केली आहे.

**आता पुढीलप्रमाणे नियम लागू राहतील -**

मतदानाच्या आधीच्या दिवशी रात्री १० वाजता सर्व प्रकारचा निवडणूक प्रचार पूर्णपणे थांबवावा. त्या वेळेनंतर सभांचे आयोजन, मोर्चे, प्रचारफेऱ्या किंवा ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास बंदी राहील. निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी व प्रसारण देखील तात्काळ थांबवावे.

ही सुधारित तरतूद आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये एक समानपणे लागू राहणार आहे. संबंधित सर्व अधिकृत आदेशांमध्ये हीच वेळ बंधनकारक असेल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. नागरिक, उमेदवार, राजकीय पक्ष, माध्यमे आणि स्थानिक निवडणूक यंत्रणांनी या सुधारित नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी केले आहे.

# थोडक्यात

## शहापूर सापगाव रस्त्यावर खड्ड्यांची दहशत; प्रवाशांना धुळीनं होरपळ

**अक्षराज : सुनिल फर्डे**



**दि.२९, शहापूर (ठाणे) :** शहापूर ते सापगाव हा जेमतेम काही किलोमीटरचा रस्ता पण प्रवास सुरू केला की खड्डे, धूळ आणि हालअपेष्टा यांचा थरारक अनुभव हमखास दररोज हजारो प्रवासी या रस्त्यातून जीव मुठीत घेऊन जातात. वाहनचालकांचे हात स्टिअरिंगवर असतात, पण मन मात्र भीतीनं थरथरतं कधी कोणत्या खड्ड्याचा उदधडून सामना होईल काही सांगता येत नाही. रस्त्यावरची धुळ इतकी की सकाळी निघालेला प्रवासी संध्याकाळी घरी पोचतेवेळी डस्ट बाथ घेऊनच पोहोचतो. बाईकस्वार तर अक्षरश नाक तोंड झाकून प्रवास करतात, तरीही श्वास घेणं कठीण झाले आहे. १० मिनिटांचा प्रवास अर्धा तास होतो आणि वाहनांचे दुरुस्ती बिल मात्र आकाशाला भिडत आहे. स्थानिक नागरिकांच्या तक्रारी,आंदोलने, निवेदने सगळं करूनही रस्त्याची स्थिती जसाच्या तशी. काम लवकरच सुरू होईल. या आश्वासनाची टेप प्रशासन दरवेळी वाजवतंय, पण प्रत्यक्षात रस्ता मात्र दररोज अधिकच विद्रूप होत चालला आहे.

# तळोजा एमआयडीसी मधील घनकचरा संकलन आणि व्यवस्थापन व्यवस्था भक्कम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, पनवेल :** 'स्वच्छ पनवेल सुंदर पनवेल' या उद्देशाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी म हापालिका क्षेत्रातील चारही प्रभाग व औद्योगिक वसाहतींमधील घनकचरा व्यवस्थापनावरती विशेष लक्ष दिले आहे. यामध्ये तळोजा औद्योगिक वसाहतीमधील घनकचरा संकलन, वाहतूक व व्यवस्थापनाची जबाबदारी महानगरपालिकेमार्फत काटेकोरपणे पार पाडली जात असून, या कार्यासाठी म हापालिकेने नियुक्त केलेल्या मे. ए.जी. इनविरो इन्फ्रा प्रोजेक्ट लि. या कंत्राटदार मार्फत नियमित सेवा पुरविली जात आहे.



महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणाऱ्या सरासरी ५०० टन कचऱ्यापैकी सुमारे २० ते २५ टन कचरा तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातून जमा केला जातो. महिन्याला जवळपास ७०० टन कचऱ्याचे संकलन व वाहतूक केली जाते. संकलित कचऱ्याची प्रक्रिया सिडकोच्या घनकचरा प्रक्रिया केंद्रात केली जात असून, या प्रक्रियेसाठीचा खर्च महानगरपालिके मार्फत सिडको प्राधिकरणास अदा केला जातो.

महापालिकेच्या आकडेवारीनुसार महानगर पालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या एकूण कचऱ्यापैकी ५ टक्के कचरा तळोजा एमआयडीसीमधून निर्माण होत असून, या कचऱ्याच्या संकलन व प्रक्रिया व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेला वार्षिक सुमारे रु.२.६८ कोटी इतका खर्च होत आहे. तथापि, तळोजा औद्योगिक क्षेत्रातून मिळणारे घनकचरा उपयोगकर्ता शुल्क अत्यल्प असून या माध्यमातून केवळ रु.२९.७५ लाख इतका महसूल प्राप्त होतो.

तळोजा औद्योगिक वसाहत क्षेत्रात एकूण ९५० औद्योगिक भूखंडांपैकी ३५८ कंपन्यांमधून नियमित घनकचरा निर्माण होतो. या कंपन्यांकडून रोज कचरा उचलण्यासाठी १ एलआरसी व २ एम आरसी वाहनांसह १२ मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे. या वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविण्यात आली असून, त्यामुळे कामावर सतत देखरेख ठेवली जाते. कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र व्हॉटस अप नियंत्रण गट तयार करण्यात आला आहे. संबंधित औद्योगिक संस्थेकडून मिळालेल्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्यात येत असून, वेळेत काम न झाल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई लागू केली जात असल्याची माहिती उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी दिली आहे.

तळोजा एमआयडीसी परिसरात रासायनिक कचरा हा घातक कचरा या श्रेणीत येत असल्याने त्याची विल्हेवाट तळोजा एमआयडीसीच्या स्वतंत्र यंत्रणेमार्फत नियमानुसार केली जाते आणि महानगरपालिका त्यात हस्तक्षेप करत नाही. महानगरपालिकेने नेहमीच स्वच्छ, सुंदर शहर व्हावे यासाठी प्राधान्य दिले आहे. यासाठी नियमबद्ध कचरा व्यवस्थापन प्रणाली आखली असून त्यानूसार तळोजा परिसराचीही नित्यनेम ाने साफसफाई केली जात असल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## कात्रज येथील ४ वर्षाच्या चिमुकल्याचा आंतरशालेय जिम्नास्टीक स्पर्धेत द्वितीय क्रमांक




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, कात्रज (पुणे) :** मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते काहीही करु शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे कु.विवांश आदित्य डाकलिया. या ४ वर्षाच्या चिमुलक्याने जिम्नास्टीक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत शाळेचे त्याच्या शिक्षकांचे, आई वडिलांचे त्याबरोबरच कात्रज परिसरात एक प्रकारे मानाचा तुरा मिरवल्याच समाधान मिळत. आईच्या पाठिंब्याने त्याने हे यश मि ळवले. हिंजेवाडी येथील राजीव गांधी इन्फोटेक पार्क येथे झालेल्या आंतरशालेय क्रिडा स्पर्धेमध्ये कु.विवांश याने जिंम्नास्टीक स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला.या यशामध्ये एस.के.जिंम्नास्टीक येथील प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण त्याने घेतले तो सॉलिटेअर किड्स या शाळेतील तो विद्यार्थी आहे. आपला मुलगा मोठ्या यशाच्या शिखरावर पोहचावा ही प्रत्येक आई वडिलांची इच्छा असते.आणी त्याला योग्य वेळी पाठबळ मिळाले तर यश हमखास पदरात पडतेच. कष्ट केले तर फळ नक्कीच मिळते या उक्ती प्रमाणे विवांशची आई त्याला प्रोत्साहन देण्याच काम करत असते. वेगवेगळ्या उपक्रमात त्याला सहभागी होण्यास त्या विवांश ला प्रोत्साहित करत असतात.आणि तोही तेवढ्या आवडीने प्रत्येक गोष्ट शिकत असतो.लहाण वयातच संस्कार केले तर ते कायम आपल्या आचरणात राहतात यामुळे त्याला या वयातच शैक्षणिक संस्कारा बरोबरच धार्मिक शिक्षणाची ही गोडी लागल्याचे पाहायला भेटते. लहाण मुलांच्या भावविश्वात बदल होत चालले आहेत हे द्वारे अधोरेखित होते.आधुनिक युगामध्ये सोशल मिडिया व मोबाईलच्या युगात नविन पिढीचे दुर्लक्ष होत असताना पालकांनी त्यांच्या बौद्धीक पातळी व उत्साह टिकवण्यासाठी खेळाकडे वळायला हवे.

# खार्डीगाव येथील स्मशानभुमीतील दहन शेगडी नवीन बसवण्याची, पाण्याची सुविधा देण्याची

## साहिल पाटील यांनी ठाणे आयुक्तांकडे निवेदन देऊन केली मागणी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, खार्डी (ठाणे) :** दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणा-या खार्डीगाव येथील स्मशानभुमीतील दोन दहन शेगडी पैकी एक शेगडी खालील बाजुस तुटलेल्या असलेल्या व्यवस्थेच्या कारणाने मागिल दिनांक १४ नोव्हेबर २०२५ रोजी एकापाठोपाठ दोन मयत आलेले असताना तुटलेल्या दहन शेगडी वर मृत्यु व्यक्तीचे शरीर ठेवताना खालिल बाजुस आडवी लाकडे रचवुन त्यावर मृत्यु व्यक्तीचे शरीर ठेवुन दहन केले गेले. परंतु अशा वेळी यंदाकदाचित खालील बाजुस आगीने पेट घेतला तर काही अपघात होण्याची शक्यता असल्याने सदर ठिकाणी नवीव दहन शेगडी तातडीने बसविण्यात यावे.

तसेच पाण्याच्या सुविधा नसल्यामुळे विधीसाठी खूप नागरिकांना अडचण होते. मयत घरातूनच पाणी घेऊन जावे लागते त्यासाठी पाण्याची सुविधा ठाणे महानगरपालिकेने करून द्यावी अशी म ागणी भारतीय जनता पार्टीचे शिळ दिवा युवा मोर्चा अध्यक्ष साहिल पाटील यांनी ठाणे आयुक्तांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

## आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेत तनुज ला सुवर्णपदक, शिवराज ला रौप्य

**अक्षराज : शिवराज मुगले**



**दि.२९, सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांनी आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन तायक्वान्दो स्पर्धे त दक्षिण सोलापूर तायक्वांडो अकॅडमी मंद्रूपची खेळाडू तनुजा नंदकुमार पवार हिने ५८ ते ६२ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले. तिची सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली आहे. याशिवाय या स्पर्धे त मंद्रूपचे खेळाडू प्रणाली उमण्णा व्हनमाने ४६ ते ४९ कांस्यपदक मिळविले. तर मुलांमध्ये यश अमोगसिध्द खंदारे याने ५४ किलो वजन गटात कांस्यपदक तसेच

शिवराज सोमनिंग बोळकवठे ५८ते ६३ या वजनी गटात रोप्यपदक मिळविले. सुवर्णपदक विजेती खेळाडू तनुजा पवार हिची सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली आहे. पंढरपूर येथील उमा महाविद्यालयात या तायक्वान्दो स्पर्धा पार पडल्या. पदक प्राप्त खेळाडूंना दक्षिण सोलापूर तायक्वान्दो अकॅडमी मंद्रूपचे मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शिक्षक व मार्गदर्शकांचे दक्षिण सोलापूर तायक्वान्दो अकॅडमीचे अध्यक्ष प्रवीण जोडमोटे, रेश्मा राठोड, दीपक धूळखेडे, सचिन कुंभार, सिध्दाराम विजापुरे यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# राज्यात फुटबॉलचा पाया मजबूत करण्याच्या उद्दिष्टाने महा-देवा महत्वपूर्ण प्रकल्प

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, मुंबई :** क्रीडा विभागातर्फे'प्रोजेक्ट म हा-देवा'च्या राज्यस्तरीय स्काऊटिंग अंतिम फेरीचे उद्धाटनमित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत कुपरेज फुटबॉल मैदान येथे करण्यात आले. महाराष्ट्रात फुटबॉलचा पाया मजबूत करण्याच्या उद्दिष्टाने सुरू झालेल्या या प्रकल्पाच्या महत्त्वपूर्ण टप्प्याची दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी औपचारिक सुरुवात झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील,विशेषतः ग्रामीण भागातील फुटबॉलचा विकास साधण्यासाठी'प्रोजेक्ट महा-देवा'ची अंम लबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील प्रतिभावान खेळाडू शोधणे, त्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि प्रगतीसाठी आवश्यक पाठबळ देणे हे प्रकल्पाचे मुख्य ध्येय आहे.

ग्रामपातळीवर सुरू झालेल्या निवड प्रक्रियेतून राज्यातील १२० प्रतिभावान फुटबॉलपटूंनी प्रोजेक्ट महा-देवाच्या अंतिम राज्यस्तरीय चाचणीपर्यंत मजल मारली आहे. या प्रक्रियेतून राज्यातील सर्वोत्तम ३० मुले आणि ३० मुलीनिवडण्याची अंतिम फेरी आता पार पडत आहे.निवडलेल्या६०फुटबॉलपटूंना महाराष्ट्र सरकारतर्फे पाच वर्षांची विशेष शिष्यवृत्तीप्रदान केली जाणार आहे. तसेच या तरुणांना१४डिसेंबर रोजी जगप्रसिद्ध फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्याकडून प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

या कार्यक्रमालामित्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी,विफाचे उपाध्यक्ष मालोजीराजे छत्रपती, मित्रचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, नवनाथ फडतरे, युनिसेफ इंडियाच्या प्रमुख सिंथिया मॅकेफ्रे, युनिसेफ महाराष्ट्राचेप्रमुख संजय सिंह तसेचव्हीएसटीएफचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपसिंह बायस गोट टूर प्रमोटर सत्तादूर दत्ता उपस्थित होते. भारत २०३४ फिफा वर्ल्ड कपसाठी पात्र ठरेल,तेव्हा राष्ट्रीय संघातकिमान पाच खेळाडू महाराष्ट्रातील असावेत, या दृष्टीने राज्य सरकार आणि क्रीडा विभाग विशेष प्रयत्नशील आहेत. क्रीडा विभाग, मित्रा, विफा, विएसटीएफ आणि अन्य संस्थांच्या सहकार्याने'प्रोजेक्ट महा-देवा'महाराष्ट्रातील फ ुटबॉलप्रेमी तरुणांना जागतिक दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा निर्णायक उपक्रम ठरत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## महाराष्ट्र शासन कृषी विभागातर्फे-राष्ट्रीय अन्न सुरक्षा, पोषन अभियान

**अक्षराज : राजकुमार इकडे**



**दि.२९, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव मशिद येथे महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत मौजे रांजणगाव येथे राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषन अभियानाअर्तंगत मका रब्बी हंगाम शेतकरी प्रशिक्षणाचे अयोजन करण्यात आले होते. यावेळी शेतकरी वर्गाला मार्गदर्शन करण्यासाठी रायतळे येथील प्रगतशिल शेतकरी अर्जुन साबळे यांनी पॉलीहाऊस व शेडनेट मधील शेती व डाळींब पिकावर मार्गदर्शन केले. बाळासाहेब कर्डीले यांनी मका पिक लागवड तत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले. पारनेर तालुका कृषीअधिकारी गजानन घूले यांनी कृषी विभागाच्या विविध योजना बाबत व महाविस्तार अख ॲप बाबत माहीती दिली. मंडल कृषी अधिकारी वृषीकेश भवर यांनी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा बाबत माहीती दिली, कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपकृषी अधिकारी विनोद सरोदे यांनी केले तर, आभार सहायक कृषीअधिकारी वैशालीताई भुजबळ, शिरसागर यांनी मानले. कार्यक्रमासाठी गावचे सरपंच महेश देशमुख, उपसरपंच शिवाजी शिंदे सोसायटीचे चेअरमन अनिल जवक, सतोंष जवक, प्रा.शिंदे, योगेश घुले, विजय जवक, सहायक कृषी अधिकारी ठकाजी भुजबळ, संतोष गावखरे, कैलास रासकर, आदी शेतकरी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शताब्दी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, बुलढाणा :** 'हिंद दी चादर' गुरू तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शताब्दी वर्षानिमित्त दि न्यू इरा हायस्कूलमध्ये विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

रकार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांच्या हस्ते गुरू तेग बहादूर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. शरद गोमासे यांनीही म




ाल्यार्पण करत गुरूंना अभिवादन केले. विद्यार्थ्यांसाठी दाखविण्यात आलेल्या ३ मिनिटांच्या माहितीपूर्ण चित्रफितीत गुरूंच्या अद्वितीय त्यागाचा, धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याचा आणि मानवतेसाठी केलेल्या अप्रतिम कार्याचा आढावा घेण्यात आला. गणेश आसेरकर यांनी गुरू तेग बहादूर यांच्या जीवनकार्यावर सखोल माहिती देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षक वर्गाचे उत्स्फ ूर्त प्रतिसाद लाभला.गुरू तेग बहादूर यांच्या अद्वितीय त्यागाला मानाचा मुजरा.